# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १७/१०/२०२४ (गुरूवार)

## पोस्टे पारशिवनीहद्दीतील मौजा साहोली येथील घटनेबाबत

महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार लोकांना घर बांधकामासाठी गैरसोय होवु नये साठी वेगवेगळया ठिकाणी वाळु डिपो तयार करण्यात आले आहे. पो.स्टे.पारशिवनी हद्दीतील मौजा साहोली (अ) वाळु डिपो हा सन २०२२—२३, २०२३—२४ व २०२४—२५ या कालमार्यादेसाठी कंत्राटी पद्धतीने " **मे.नमस्वी ट्रेडर्स सावनेर** " यांना देण्यात आला आहे. परंतु काही कारणास्तव सदरचा वाळु डेपो मौजा साहोली येथुन मौजा गरांडा शिवारात हलविण्यात आला. दिनांक.दिनांक ०८/०६/२०२४ चे पुर्वी सदर ठिकाणी साहोली, गरांडा व वाघोडा घाटातुन रेती उपसाकरुन स्टॉक करण्यात आला. नागरिकांनी वाळु विकत घेण्यासाठी ऑन लाईन बुकिंग केल्यानंतर सदर स्टॉक मधुन दिनांक. ०९/१०/२०२४ पासुन रेती देणे सुरु केले. सदर रेती भरलेले ट्रक हे वाघोडा ते डोरली ते सिंगोरी पर्यंत येवुन नंतर पारशिवनीकडे किंवा खापरखेडा कडे जातात. मात्र सदरचे ट्रक हे डोरली गावातील आतील अरुंद रस्त्याने जात असल्यामुळे गावातील नागरिकांना त्रास होवु लागला व सदरचे रेतीने भरलेले ट्रक हे गावातुन जात असल्यामुळे गावातील कमी क्षमतेचे रोड खराब होवुन नये यासाठी गावातील सरपंच प्रकाश दौलतराव अंजनकर व त्यांचे सहकारी लोकांनी सदरचे ट्रक गावातुन जाऊ न देण्याचे आवाहन केले, यादरम्यान दिनांक. १६/१०/२०२४ रोजी सदरचे ट्रक हे गावातील रंजीत नामदेव गजभिये यांचे घरासमोरील रोडने मुरुमाने व रेतीने भरलेले ट्रक गावात कसे आले? असे म्हणुन ट्रक चालकांना इथुन पुन्हा यायचे नाही, असे सांगुन ट्रक सोडुन दिले याच कारणावरुन गावातील सरपंच प्रकाश दोलतराव आंजनकर व रंजीत गजभिये यांचे आपसात झगडा भांडन झाला व दोन्ही पक्ष एकमेकांचे विरोधात रिपोर्ट द्यायला आले, परंतु दोन्ही पक्ष एकच गावातील राहणारे असल्याने व दोघांना एकमेकांचे विरोधात पोलीस कार्यवाही करायची नाही, असे समझौता नामा लिहुन दिल्याने दोन्ही पक्षावर कोणतीही कार्यवाहीझाली नाही.**मा. श्री. रमेश बरकते , उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देवुन सदर प्रकरणात सखोल चौकशी केली असता मौजा साहोली येथुन मौजा गरांडा शिवारात हलविण्यात अलेला वाळु डेपो चा शासकीय परवाना असल्याचे माहीती प्राप्त झाली. सदरचा वाद हा गावातुन जड वाहतुकी बाबत असल्याने त्या बाबत तोडगा तसेच पर्यायी मार्ग काढण्यासाठी मा.उपविभागिय अधिकारी तसेच तहसीलदार यांचे सोबत चर्चा करण्यात येणार आहे.**

तरीही दोन्ही पक्षामध्ये पुन्हा वाद होवु नये यासाठी दोन्ही पक्षांतील सदस्यांना कलम १६८ भा.ना.सु.सं.अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

## पोस्टे देवलापार येथील अपराध क्र. ११८/१९८१ कलम ३७६ भादवि गुन्हयातील अटक आरोपी नामे मानिराम काशिराम ठाकरे उर्फ मिनिराम कारू ठाकरे हा एकच व्यक्ती

पोस्टे देवलापार येथील अपराध क्र. ११८/१९८१ कलम ३७६ भादवि गुन्हयातील आरोपी नामे: मानिराम काशिराम ठाकरे उर्फ मिनिराम कारू ठाकरे यास तत्कालीन तपासी अधिकारी यांनी गुन्हयात दि.१८/१०/१९८१ रोजी अटक करून मा.कोर्टात पेश केले होते त्यावेळी मा.कोर्टानी त्यास न्यायालयील कोठडी दिली होती. त्यांनतर आरोपी हा जामिनावर बाहेर आला व मा. कोर्टात हजर न झाल्याने त्याचा मा.रामटेक कोर्टानी बिगर जमानती वारंट काढल्याने पोलीसांकडुन सदर आरोपी याचा शोध घेवुन गुन्हयातील आरोपी नामे: मानिराम काशिराम ठाकरे उर्फ मनिराम कारू ठाकरे हा एकच आहे किंवा कसे याबाबत न्यु—तोतलाडोह व आजुबाजूच्या गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, प्रौढ नागरीक यांचे कडे सखोल चौकशी व विचारपुस करून तो एकच असल्याचे व त्याचे वर वरील प्रमाणे जुना गुन्हा असल्याचे गोपनीय माहीतीचे आधारे निष्पन्न झाल्याने सदर आरोपी मानिराम काशिराम ठाकरे उर्फ मनिराम कारू ठाकरे वय ६१ वर्षे,रा: न्यु—तोतलाडोह रयतवाडी यास मा.कोर्टाचे प्राप्त बिगर जमानती वारंट (NBW) वरून दि.०६/०९/२४ रोजी अटक करून मा.न्याय दंडाधिकारी कोर्ट रामटेक येथे पेश करून मा.कोर्टानी मध्यवर्ती कारागृह येथे रवाना केले होते. **पोलीस स्टेशन देवलपार ठाणेदार यांनी सखोल चौकशी केली असता मानिराम काशिराम ठाकरे उर्फ मिनिराम कारू ठाकरे ही व्यक्ती एकच असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले.**

## अवैधरेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
## वाहनासह एकुण ५०५०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १६/१०/२०२४रोजी पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, महाजन पेटोलपंप जवळ चनकापुर येथे अवैधरित्या विनापरवाना रेती (वाळू) वाहनामध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून महाजन पेटोलपंप जवळ चनकापुर येथे मेटाडोर वाहन क्र. एम एच 40 सीडी 3650 हा समोरून येतांनी दिसला. ट्रकला थांबवुन ट्रक चालकास ट्रकमध्ये काय आहे असे विचारले असता चालकाने ट्रकमध्ये रेती असल्याचे सांगितले.चालकास रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितले. ट्रक चा चालकाने विनापरवाना अवैध्यरित्या रेती वाहतुक करतांना मिळुन आल्याने मेटाडोर मधील ०१ ब्रास रेती किंमती ५०००/—रू. व मेटाडोर वाहन क्र. एम एच 40 सीडी 3650 किंमती ५०००००/—रू. असा एकुण ५०५०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून मेटाडोर वाहन क्र. एम एच 40 सीडी 3650 चा चालक आरोपी नामे— 1) रोहीत राकेश डोंगरे वय 24 वर्ष रा. चिचोली वार्ड क्र. 01 2) फरार मालक नामे—रविंद्र उईके, रा. चिचोलीयांचेविरुद्ध पोस्टे खापरखेडा येथे कलम 303(2) भा.न्या.सं. सक. 48(8), 48(7) म. ज. अधि सक. 4, 21खान खनिज अधि. सहकलम 3 सार्व स. नुक अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान श्री. संतोष गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोनि अरविंदकुमार कतलाम, पोहवा प्रफुल राठोड, प्रदीप मने, शैलेश यादव, मुकेश वाघाडे, राजू भोयर, राजकुमार ठाकुर, मपोहवा कविता गोंडाणे यांनी केली.




**अवैधरेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक**
**वाहनासह एकुण ६,५५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त**

दिनांक १६/१०/२०२४ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की,भिल्लेवाडा ते मनसर रोडने ट्रॅक्टरद्वारे सुर नदी पात्रातुन अवैधरित्या विनापरवाना रेतीचे उत्खनन करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून डोले यांचे शेता जवळ मौजा भिल्लेवाडा शिवार रामटेकयेथे नाकाबंदी करून यातील **आरोपी चालक व मालक नामे—**बादल गणेश बावनकुळे, वय 30 वर्षे रा. सोनेघाट ता. रामटेक हा त्याच्या ताब्यातील महिंद्रा कंपनीचा लाल रंगाचा मुन्डा क्र. एम.एच—३६/ए.जी—०२१० व विना नंबरची लाल रंगाची ट्राली मध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती विनापरवाना अवैधरित्या कोणतेही शासकीय रॉयल्टी परवाना न बाळगता चोरी करून वाहतुक करतांनी मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून महिंद्रा कंपनीचा लाल रंगाचा मुन्डा क्र. एम. एच—३६/ए.जी—०२१० किंमती ५,००,०००/—रू.व विना नंबरची लाल रंगाची ट्रॉली किंमती अंदाजे १,५०,०००/—रू. मध्ये ०१ ब्रास रेती ५०००/—रू अशा एकुण किमती ६,५५,०००/— रू जप्त करण्यात आला आहे. आरोपी याचेविरुद्ध पोस्टे रामटेक येथेकलम 303 (2) बी.एन.एस. सहकलम 48(7), 48 (8) महा.जमीन महसुल अधि. 1966 स.कलम 4, 21 खानी खनिजे (विकास आणी नियमन) अधि.1957, स.कलम 3 सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधि.1984 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोनि अशोक शेटे, सपोनि प्रशांत पाटणनकर, पोहवा अमोल इंगोले, पोना प्रफुल रंधई, पोअं. रूपेश राठोड यांनी केली.




## पोस्टे केळवद हद्दीतील छत्रपूर खदान परिसरात
## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

दि. १६/१०/२०२४ रोजीपो.स्टे. केळवद हद्दीत छत्रपूर खदान परिसरात अवैधरित्या गावठी पद्धतीने भट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु गाळणारीमहिला **आरोपी** हीमोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आली. आरोपीचे ताब्यातून १) ३ प्लॅस्टिक डबकी मध्ये ६० लिटर मोहफुल गावठी दारू किमती ६०००/–रु २) ४ प्लॅस्टिक ड्रम मध्ये प्रत्येकी २०० लिटर प्रमाणे मोहफुल रसायन सडवा एकूण ८०० लिटर प्रत्येकी लिटर ३५/– रुपये प्रमाणे एकूण किंमती २८,०००/– रु ३) ४ प्लास्टिक खाली ड्रम किंमती४०००/–रू. ४) २ लोखंडी खाली ड्रम किंमती ३०००/–रू. ५) २ टन जलाउ लाकडी लाकूड २५००/– रु. टन प्रमाणे एकूण किंमती ५०००/–रू. ३ प्लस्टिक डबकी प्रत्येकी किंमती १२०/– प्रमाणे एकूण किंमती ३६०/– रुपये व दारु काढण्याचे इतर साहित्य एकूण की. ३५००/–रु असा एकूण ४९, ८६०/– रु चा मुदेमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे केळवद यांचे ताब्यात देवून वरील आरोपी विरुद्ध पो.स्टे केळवद येथे कलम ६५ (एफ), (सी), (ई), (ब)महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, मा अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळयांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे,पोहवा आशिष मुंगले, पोहवा रविंद्र चटप, पोशी धोंडूतात्या देवकते, मनापोशी वनिता शेंडे यांनी पार पाडली.



**पोस्टेरामटेक हद्दीतीलनगरधन परिसरात**

**अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही**

दि. १७/१०/२०२४ रोजीपो.स्टे.रामटेक हद्दीत नगरधन परिसरात अवैधरित्या गावठी पद्धतीने भट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु गाळणारापाहिजे **आरोपी नामे–लक्ष्मण गहाने, वय ४० वर्ष, रा. नगरधन ता. रामटेक जि. नागपूर** हा मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून१) प्लॅस्टिक डबकी मध्ये १२ लिटर मोहफुल गावठी दारू किमती १२००/–रु २) मोहफुल रसायन सडवा एकूण ६००० लिटर प्रत्येकी लिटर ३५/– रुपये प्रमाणे एकूण किंमती २,१०,०००/– रु असा एकूण २,११,२००/– रु चा मुदेमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे रामटेक यांचे ताब्यात देवून वरील आरोपी विरुद्ध पो.स्टे रामटेक येथे कलम ६५ (एफ), (सी), (ई), (ब)महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, मा अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे,सपोनी मनोज गदादे, पोहवा नारायन राठोड, पोहवा उमेश फुलबेल, पोशी निलेश इंगुलकर, चापोहवा राहुल पाटील यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर